Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-4 | Issue-6 | Dec-2014 Available online at www.aygrt.isrj.org

नानासाहेब पेशव्यांच्या चुकीच्या धोरणामुळे मराठा आरमाराचा नाश

प्रशांत कोठे

इतिहास विभाग प्रमुख , श्री शिवाजी महाविद्यालय, आकोट.

सारांश - भारताच्या प्राचीन इतिहासाकडे पाहीले तर दक्षिण भारतात चोलांची सत्ता सामुद्रीक शक्ती साठी प्रसिध्द असल्याचे दिसते. त्यांचे आरमार उत्कृष्ट होते. त्याच्या भरवश्यावरच त्यांनी आग्नेय आशियातील अनेक बेटांवर जवळ जवळ १०० वर्षापर्यंत राज्य केले होते. १२ व्या शतकानंतर भारतीय सत्ताधिशांनी समुद्रकिनाऱ्याचे महत्व लक्षात घेतले नाही. परंतू १६ व्या शतकात जगाच्या इतिहासात सागरी वाहतूकीला महत्व प्राप्त झाले. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज व्यापाराला महत्व दिले. या सत्तांनी भारतीय किनाऱ्यावर व्यापारी व सामुद्रीक शक्ती केंद्रे निर्माण केली. ते सामर्थ्यसंपन्न व शक्तीशाली असल्याने तत्कालीन शासकांनी लक्ष न दिल्याने समुद्रकिनाऱ्यावर परकीय सत्तांचे वर्चस्व प्रस्तापित झाले. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करतांना या परकीय सत्तांशी संघर्ष झाल्याने त्यांना आरमाराचे महत्व लक्षात आले. या सत्तांना अटकाव केला नाही तर त्याचे गंभीर परिणाम घडून येईल हे ओळखणारा तो पहिला शासक होता. म्हणूनच त्यांनी नौदल निर्मितीकडे लक्ष दिले. शिवाजीने निर्माण केलेल्या शक्तीशाली नौदलाने परकिय सत्तांवर अंकूश निर्माण केला. त्याचे अनेक पुरावे परकीयांच्या पत्रव्यवहारात दिसून येत. परंतू या परकियांच्या मनात धडकी भरणाऱ्या आरमाराचा पेशव्यांनी मात्र नाश केला व भारताचा वेगळा इतिहास निर्माण झाला. हा मराठा आरमाराचा नाश नानासाहेब पेशव्या काळात झाला. त्या नानासाहेबास दुरदृष्टीचा, मुत्सद्दी, चानाक्ष म्हटले आहे ते बरोबर दिसत नाही . हा या शोधनिबंधाचा विषय आहे.

प्रस्तावना-

अनेक इतिहासकारांनी मराठयांच्या इतिहासात नानासाहेब पेशव्यांची मुक्तकंठाने स्तुती, वाहवाह केलेली दिसून येते. काही इतिहासकारांनी तर शिवाजी नंतर निर्माण झालेला महापुरूष संबोधले आहे. संपूर्ण मराठेशाहीत नानासाहेब यांच्यासारखा दुरदृष्टीचा दुसरा पेशवा झाला नाही असेही संबोधतात. त्यांच्या काळात मराठेशाहीला उत्तुंग शिखरावर पोहचविणारा, संपूर्ण हिन्दुस्थानात मराठयांची हिंदुपदपादशाही निर्माण करण्याचे स्वप्न बाळगणारा म्हटले आहे. त्याच्याच कारकीर्दीत मराठयांनी अटकेवर झेंडे लावले.[१] म्हणूनच काही इतिहासकारांनी नानासाहेबांना दिग्विजयी संबोधले आहे. राजवाडे सारखे इतिहासकार आंग्रे प्रकरणात 'एवढा चाणाक्ष नानासाहेब पेशवा पण तो कसा चकला'[२] असे उद्गार काढतात. तर मग

खरोखरच नानासाहेब पेशवा दुरदृष्टीचा, चाणाक्ष, मुत्सद्दी होता काय? यामुळेच नानासाहेबाच्या कारकिर्दीतील काही घटनांवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

नानासाहेब पेशवा दुरदृष्टीचा होता असे म्हणणाऱ्या इतिहासकारांना पेशवे-आंग्रे प्रकरणात नानासाहेबाजवळ किती दुरदृष्टी होती? हा सबळ पुरावा देता येतो. ज्या दुरदृष्टीने शिवाजी महाराजांनी आरमाराची १६५८-५९ मध्ये बांधणी केली.[३] त्याचा विचार करता नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठयांचे राज्य जेवढे होते त्याच्या मानाने शिवाजीचे किती? याचे उत्तर असेच मिळेल की, केवळ टिचभर. परंतू राज्यरक्षणाच्या बाबतीत त्यांची दृष्टी एवढी तिक्ष्ण होती की ते स्वत: देशावर राबणारे होते तरी त्यांना आरमाराची आवश्यकता वाटली.[४] शिवाजीला पाश्चात्याच्या नौकायन ज्ञानाची पूर्ण जाणीव होती आणि म्हणून त्यांनी शक्य ती खटपट करून शत्रुस दहशत वाटण्यासारखे आरमार उभारून ठेवले. आरमारोच महत्व व पाश्चात्यांची या कलेतील पारंगतता याची केवढी छाप शिवकालीन प्रधानांवर होती याचे उदाहरण रामचंद्रपंत अमात्याच्या राजनितीतील 'आज्ञापत्रात' वाचावे. त्यांनी आरमाराविषयी किती अभिमान बाळगावा? आणि हीच नाविक परंपरा आंग्रेच्या घरी आली. तुळाजी हा संभाजी प्रमाणेच इंग्रजांचा कट्टर शत्रू होता.[५] आंग्ऱ्यास त्याने एवढे बलशाली केले की त्याची मदत पाश्चात्यांना सुद्धा हविशी वाटत होती. हे आपणाला इंग्रज-फ्रेंच युद्धात (आनंद रंग पिल्ले याने सात हजार तुळोजीचे आरमार तेलीचेरीस फ्रेंचाच्या मदतीला आले होते अशी नोंद आहे) घेतल्याचे दिसून येते. अशा आंग्ऱ्यास आणि तेही आंग्ऱ्यास इंग्रजाची मदत घेऊन बुडविणे या इतकी मुत्सद्देगीरीची बाण दाखविणारी दुसरी गोष्ट पेशव्यास करणे शक्य नव्हते. तरी रियासतकारत सरदेसाई या बाबत म्हणतात, "नानासाहेबाने मराठयांचे आरमार बुडविले" हे विधान अतिशयोक्त होय. राजवाडयापासून पुढे अनेकांनी पेशव्यास दोष देऊन बराच सत्यालाप केला आहे. हे फारसे कोणाच्या लक्षात येत नाही. विजयदुर्गचे बंदरात तुळोजीची साठ लढाऊ जहाजे जळून खाक झाली हे कृत्य इंग्रजांनी केले. त्यांनाच या जहाजांचा जाच होता. पेशव्यांचा राग तुळोजीवर होता, त्यांच्या आरमारावर नव्हता. इंग्रजासारख्या शत्रुची मदत घेऊन पेशव्याने आंग्ऱ्याला नाहीसे केले हेही विधान सर्वस्वी खरे नाही. नानासाहेबांच्या वेळी इंग्रजांची गणना शत्रुवर्गात नव्हती. पाश्चात्यांची धोरणे व त्यांचे सामर्थ्य याची जाणीव ऐतदेद्रशीयांना अद्याप व्हायची होती. हे परके व्यापारी कुशल दर्यावर्दी हाते हे पेशव्यास माहीती होते. पण हिन्दुस्थानात मुलूख जिंकून राज्ये स्थापन करावी ही कल्पना त्यावेळी खुद्द त्यांना स्वत:लाच नव्हती तर मग पेशव्याला कशी असावी! ..... असे मत व्यक्त केले आहे.

या सरदेसाईच्या मतात किती तथ्य आहे, त्यांनी केलेले समर्थन किती लंगडे आहे हे तत्काळ दिसून येते. ते म्हणतात, "पाश्चात्यांची धोरणे आणि त्यांचे सामर्थ्य याची जाणीव ऐतद्देशीयांना अद्याप व्हायची होती". असे आहे तर नानासाहेब सत्तेवर येण्यापूर्वीच 'आज्ञापत्रा'त 'जलचरा' विषयी भेदक टिका येते ती कशी?[६] जलचरांची राज्ये आहेत आणि राज्य करणाऱ्यास स्थळ लोभ नाही असे काय घडो पाहते? असा प्रश्न ही त्यांना स्पष्टपणे विचारण्यात आला आहे. त्यांच्याविषयीच रामचंद्र अमात्य म्हणतात 'त्यांची जात चिवट' आणि 'घेतलेली जागा ते मेल्यानेही सोडणार नाहीत'[७] असे म्हणतात. तेव्हा 'इंग्रजांची गणना त्यावेळी शत्रुवर्गात नव्हती' हे सरदेसाई यांचे विधान कसे टिकावे? याच वेळी मद्रासच्या किनाऱ्यावर इंग्रज-फ्रेंचाचे युद्ध सुरू होऊन दक्षिणेतील राजकारणात नव्या पक्षाचा उदय झाला होता. (डुप्लेच्या मदतीनेच चंद्रासाहेबाने अर्काटचा नबाब अन्वरूद्दीन यास १७४९ च्या ऑगष्ट मध्ये ठार केले) इंग्रजांच्या भेदनितीची नानासाहेबांस चांगली कल्पना होती. हे रियासतकारांनीच अन्यत्र दाखवून दिले आहे. राजपूतान्यातील जयपूरच्या वारसा प्रकरणात शिंदे आणि होळकर ह्यांच्यात वाकडे आले तेव्हा त्या संदर्भात नानासाहेब लिहतो, "हिन्दुस्थान दुरलौकीक होऊन कार्यनाश होऊ शकतो. उमदे-उमदे मनसुब्यास अंतर पडून कित्येक फितवे अंग्रेज लोकास बोटे घालावयास जागा होनार असे चितात येते" हे पारसनिस संग्रहातील अप्रकाशीत पत्र रियासतकारांनीच उदधूत केले आहे. तेव्हा इंग्रजाची राजनीती काय प्रकारची होती हयाची कल्पना नानासाहेबास इ.स. १७४७ पुर्वी पासूनच होती आणि हे रियासतकारांनाही माहीत आहे.[८] (मराठी रियासत: मध्य विभाग २, मुंबई १९२१ पृ. ६८) आणि तरीही ते हया ठीकाणी नानासाहेबाला इंग्रजाची चाल ठाऊक नव्हती असे खुशाल म्हणतात ! तसेच नानासाहेबाला तुळोजीचे आरमार बुडवायचे नव्हते: फक्त तुळोजीचा बंदोबस्त करायचा होता, हे म्हणण्यात तरी काय अर्थ आहे? तसे होते तर, नानासाहेबानं इंग्रजांशी फक्त तुळोजीला पकडायचे असाच करार का केला नाही. मग कशाला तुळोजी आंग्रे हयांची जी जहाजे काबीज होतील ती इंग्रज आणि पेशव्यांनी सारखी वाटून घ्यावी

हे कलम घातले.[९] जी अर्धी जहाजे इंग्रजांच्या हीशाला जाणार होती ती का मराठा आरमाराची नव्हती? त्याच्या एकाही जहाजाला हात लावायचा नाही असा करार कां नाही केला? इंग्रजांना तुळाजीचे आरमार खुपत होते म्हणून त्यांनी आवेशाने ते बुडविले हे खरे आहे पण पेशव्याने त्यांच्याशी दोस्ती करून त्यांना विजयदुर्गापर्यंत नेले म्हणूनच हे त्यांना सुलभ झालेना?

मराठा आरमार शिवाजीने मोठया दुरदृष्टीने स्थापन करून जोरात आणून ठेविले [१०] ते त्याने बुडविले. कोकणातले कोळी व भंडारी हया सारखे खलाशी पृथ्वीवर क्वचित सापडतील. त्यांना पाश्चित्यांचे नौकानयन शिकवीले असते तर राज्यास अतिशय बळकटी आली असती. अनादीकाळापासून नौकानयनात हिन्दुस्थानाचे नाव प्रमुख असुन याच विद्येच्या जोरावर हिंदुनी आर्य सुधारणा पृथ्वीवर पसरली. तिचा शेवटचा अवशेष शिवाजीने मोठया परिश्रमाने पश्चिम किनाऱ्यावर राखला. अशा प्रकारचे मराठी आरमार बाळाजी बाजीरावाने (नानासाहेब) इंग्रजांची मदत घेऊन बुडविले. त्यान तुळाजी आग्रे नाहीसा केला. आपले काम करण्यास शत्रुची मदत घेऊ नये हे मोठे तत्व बाळाजीने लक्षात घेतले नाही. अठराशे सत्तावनच्या बंडात हिंदुस्थानात इंग्रजांची धांदल उडाली असतांना फ्रान्सचा राजा दुसरा नेपोलीयन याने इंग्रज प्रधान मंडळास असे सुचविले की मी एक आरमार करून तुमच्या मदतिला पाठवीतो. परंतू इंग्रजांनी ही फ्रान्सची मदत स्विकारली नाही. हयातील मर्म ध्यानात ठेवण्याजोगे आहे. परंतू या कडे नानासाहेबाने दुर्लक्ष केले. तरी राजवाडे या प्रकरणावर लिहतात, "एवढा चाणाक्ष नानासाहेब पेशवा, पण तो कसा चकला." आम्ही अशी अक्षम्य चुक करणाऱ्यास चाणाक्ष म्हणावयास तयार नाही. अशी चुक पेशव्याच्या हातून घडण्याचे कारण एकच, त्यांचे गाढ अज्ञान होय.

आंग्रेचा बंदोबस्त हा पेशव्याच्या आपल्या हाती सर्व सत्ता एकवटण्याच्या उद्योगाचाच एक भाग होता. दाभाडे, गायकवाड, नागपूरकर, भोसले हयाप्रमाणेच तुळोजीलाही याची जागा दाखवायची हाच पेशव्याचा निर्धार होता. म्हणून मानाजीला सहाय्य करणे पेशव्याच्या दृष्टीने सोयीचे होते आणि यातूनच हा अनर्थ घडला.

पेशव्यांच्या शासन काळात शिवाजीचे लढाऊ जहाज व नौसेना नष्ट झाली. पेशव्यांनी जर शिवाजीने स्थापन केलेल्या या उत्कृष्ट नौदलाचा उपयोग योग्य रितीने केला असता तर भविष्यात भारताच्या इतिहासात एक नविन युगाला सुरूवात झाली असती आणि इतिहास काही निराळा राहीला असता.

संपूर्ण पेशवाईचा विचार करता त्यातही नानासाहेबांच्या कारकीर्दीत आपल्याला मानीत नाहीत व कदाचीत आपणाहून वरचढ होतील म्हणून राज्यातील पराक्रमी मानसास सदा ठेचीत राहणाऱ्या पेशव्याच्या धोरणामुळेच पेशवाई कमकुवत राहीली आणि हा अनर्थ घडून आला.[११] व्यक्तीचा स्वार्थ जर मोठया प्रमाणात बळावला तर कर्तव्य निष्ठा कोठे राहणार? आपण सर्व एक, आपल्या सर्वांचे हीत एकच. ही भावना जर समाजातून नष्ट झाली तर चार लोक एका मार्गाने कसे जाणार? अशीच काही स्थिती त्या काळी होती. दुर्देवाने आमच्यातही ती तशीच आजही कायम आहे. अशी कल्पना त्या काळचे असल लेख वाचणाऱ्यांची होती. हे कालमात्म्य त्या काळी ओळखून नानासाहेबाने शिवाजीचा कार्यक्रम आखला पाहीजे होता. पण ते त्याला साधलेलले दिसत नाही हेच निश्कर्षात दिसून येते.

संदर्भ :

१. आपटे द. वि. ओतुरकर - महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास पत्र क्र. १३९ पृष्ठ १३५
२. शेजवलकर त्र्यं. श. - निजाम पेशवे संबंध
३. कुनिया बी. एन. - मराठा प्रभुत्व-लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन १९९२
४. खोल विलास - आज्ञापत्र-आठवी आवृत्ती, मुंबई पृष्ठ ३७
५. केळकर न. ची. - मराठे-इंग्रज पृष्ठ १४९
६. खोल विलास - आज्ञापत्र- पृष्ठ ३७
७. कित्ता - पृष्ठ ७०
८. सरदेसाई गो. स. - मराठी रियासत मध्य विभाग २, मुंबई १९२१ पृष्ठ ६८

९. कोलारकर श. गो - मराठयांचा इतिहास
१०. शेजवलकर - निजाम पेशवे संबंध
११. कित्ता - पृष्ठ ६७